ePaper

**तीन जागांवरुन आघाडीत बिघाडी? ठाकरे गटाचे इच्छुक 'मातोश्री'वर**



| वर्ष - 8 | अंक -100 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 18 ऑक्टोबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत


- आफ्रिकन संघाने घेतला बदला
- तिसऱ्या क्रमांकावर का पाठवलं?
- बिश्नोईमुळे भारत-कॅनडा वाद चिघळला
- मोदी पाकिस्तानात आले असते तर...


## आम आदमी पार्टीच्या नेत्यांमध्ये खलबते

# हरियाणातील चूक महाराष्ट्रात सुधारणार!

## पक्षश्रेष्ठींचे संकेत : स्वबळावर लढण्याची चूक करणार नाही

| मुंबई | महाईन्यूज

**हरियाणातील काँग्रेसच्या पराभवानंतर इंडिया आघाडीचे नेते सावध झाले आहेत. फाटाफुटीचा महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभेच्या निवडणुकीत फटका बसू नये म्हणून इंडिया आघाडीच्या नेत्यांनी ताकही फुंकून पिण्यास सुरुवात केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून आम आदमी पार्टीने महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभेची निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला आहे. या दोन्ही राज्यांच्या निवडणुकीत आप इंडिया आघाडीला पाठिंबा देणार असल्याचं सूत्रांनी सांगितलं. आम आदमी पार्टीच्या या खेळीमुळे दोन्ही राज्यात भाजपला मोठा फटका बसू शकतो असं सांगितलं जात आहे.**



सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आम आदमी पक्ष महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये विधानसभा निवडणूक लढवणार नाही. दिल्लीतील आगामी विधानसभा निवडणुकीवर फोकस करण्यासाठी आपने हा निर्णय घेतला आहे. आपने इंडिया आघाडीत असतानाही काही राज्यांमध्ये निवडणूक लढवली होती. मत विभागणी झाल्याने त्याचा फायदा भाजपला झाला होता. ही मत विभागणी टाळण्यासाठी आता आपने मोठा निर्णय घेतल्याचं सांगितलं जात आहे. मात्र. इंडिया आघाडीतील घटक पक्षांच्या दबावामुळेच आपने हा निर्णय घेतल्याचंही बोललं जात आहे.

### हरियाणात पराभव

नुकतेच हरियाणा विधानसभेचे निकाल लागले आहेत. या निवडणुकीत आपला मोठा पराभव स्वीकारावा लागला आहे. आपने हरियाणात 88 जागांवर उमेदवार उमेदवार उभे केले होते. त्यापैकी 87 जागांवर त्यांचा अत्यंत दारूण पराभव झाला होता. त्यामुळेच आपने आता महाराष्ट्रात निवडणुका न लढवण्याचा निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्रातील आप नेत्यांना काही जागांवर निवडणूक लढवायची होती. पण आपच्या वरिष्ठ नेत्यांनी त्याला नामंजुरी दिल्याचं सांगितलं जात आहे.

### दिल्लीवरच फोकस

आम आदमी पार्टीचा सर्वात चांगला बेस दिल्लीत आहे. दिल्लीत आपची सत्ता आहे. मात्र लोकसभा निवडणुकीत आपला दिल्लीत मोठा पराभव पत्करावा लागला होता. त्यामुळे आपने इतर राज्यांच्या निवडणुकीत गुंतून न राहण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांनी जास्तीत जास्त फोकस दिल्लीवर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. दिल्लीत विधानसभेवर पुन्हा सत्ता आणण्यासाठी अरविंद केजरीवाल हे खास रणनीती आखण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## "नराधमाला आमच्या ताब्यात द्या"; आ. महेश लांडगेंची थेट पोलीस ठाण्यात धडक!

### फुगेवाडी येथील शाळेत अल्पवयीन विद्यार्थिनीचे लैंगिक शोषण प्रकरण

| पिंपरी |

महाईन्यूज | प्रतिनिधी|

पिंपरी-चिंचवड महापालिकेने खासगी संस्थेला चालविण्यास दिलेल्या फुगेवाडीच्या एका शाळेत दोन अल्पवयीन मुलींचे शाळेतील एका कर्मचाऱ्याने अश्लील शोषण केल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली. त्यानंतर भाजपा आमदार महेश लांडगे यांनी दापोडी पोलीस ठाण्यात धाव



घेतली. "आरोपीवर कठोर कारवाई करा, अन्यथा आमच्या ताब्यात द्या, अशी मागणी केली. दरम्यान, दापोडी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निलेश वाघमारे यांनी संबंधित आरोपीला अटक केली असून, त्याला कठोर शिक्षा होईल, अशी कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले आहे. संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी याप्रकरणी दापोडी पोलीस ठाण्यात याप्रकरणी फिर्याद दिली असून, सरफराज मन्सूर शेख (वय ३२, रा. कोंढवा पुणे) याच्यावर बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियमानुसार गुन्हा दाखल केली असून, आरोपी गजाआड केला आहे. आरोपी शेख हा शाळेतील ॲडमिन ऑफिसमध्ये काम करतो. त्याने ऑगस्ट ते २ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत मुलींचे लैंगिक शोषण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

> आरोपीवर कठोर कारवाई करावी. ज्यामुळे विकृत प्रवृत्तींना आळा बसेल. नाहीतर आरोपीला आमच्या ताब्यात द्या. मुलींच्या कुटुंबियांना सुरक्षा द्यावी. पीडित मुलींचे कुटुंबीय दबावामध्ये आहेत. शहरात अशी घटना पुन्हा घडणार नाही, अशी जबर शिक्षा आरोपीला झाली पाहिजे, अशी मागणी आग्रही मागणी केली. याबाबत संबंधित पोलीस प्रशासनाने कार्यवाही करु असे सांगितले आहे. पोलिसांना आमचे पूर्ण सहकार्य आहे. पण, कोणत्याही जाती-धर्माच्या माता-भगिनींकडे वाईट नजरेने बघणाऱ्यांचा बंदोबस्त केला पाहिजे.
>
> **– महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# पवार नव्हे, आम्ही परिवर्तन घडवू!

## परिवर्तन महाशक्तीचा निर्धार : पुण्यातील पत्रकार परिषदेत एल्गार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शरद पवार कसे परिवर्तन करणार? तो तर आमचा अधिकार आहे व आम्हीच ते करू अशा शब्दांमध्ये शेतकरी नेते माजी खासदार राजू शेट्टी यांनी शरद पवार यांच्यावर टीका केली. परिवर्तन महाशक्ती चे विधानसभा निवडणुकीसाठी राज्यातील १५० जागांवर एकमत झाले असल्याचे दावा यावेळी शेट्टी, प्रहार अपंग संघटनेचे बच्चू कडू व स्वराज्य पक्षाचे अध्यक्ष छत्रपती संभाजी राजे यांनी केला.**



स्वराज्य पक्षाच्या कार्यालयात गुरूवारी दुपारी परिवर्तन महाशक्ती या नावाने शेट्टी, कडू, संभाजी राजे तसेच शंकरअण्णा धोंडगे, वामनराव चटप व अन्य संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत या नेत्यांनी पत्रकारांबरोबर संवाद साधला. परिवर्तन महाशक्तीमध्ये समविचारी अशा तब्बल ३० ते ४० संघटना सहभागी झाल्या आहेत. आमचे सर्वांचे विधानसभेच्या १५० जागांवर एकमत झाले आहे. काही जागा दोनदोन पक्ष किंवा संघटनांना हव्या आहेत. तुमच्यामध्ये चर्चा करून तुम्हीच त्यावर निर्णय घ्या असे त्यांनी सांगितले आहे. लवकरच आम्ही आमची यादी जाहीर करू असे या नेत्यांनी सांगितले. राज्यात मोजकीच काही घराणी गेली अनेक वर्षे राज्यकर्ते आहेत. त्यांनी कष्टकरी वर्गाला कायमच उपेक्षित, वंचित ठेवले. स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली तरीही गरीब कष्टकरी वर्गाच्या घरातील अंधार काही मिटलेला नाही. या सगळ्याला उत्तर देण्यासाठी, गरीबांनी न्याय मिळवून देण्यासाठी म्हणून आम्ही एकत्र आलो आहोत. प्रस्थापितांना बाजूला करणे व जनतेच्या हातात राज्य देणे हा आमचा उद्देश आहे. त्याला जनतेची चांगली साथ मिळते आहे. आमचे उमेदवार आम्ही जाहीर करून, त्यांच्याकडून आमच्याकडे कोणी येणार असेल तर त्यांची पात्रता, उमेदवारीचे आमचे निकष पाहून आम्ही त्यांचेही स्वागत करू, ही लढाई जनतेच्या साथीनेच आम्ही जिंकणार आहोत असे शेटी, कडू व छत्रपती संभाजी राजे यांनी सांगितले.

> मी महाविकास आघाडी सोडली, कारण त्यांच्या सत्तेच्या काळात त्यांनी शेतकऱ्यांचे अहित करणारे अनेक निर्णय घेतले. उसाच्या एफआरपीची मोडतोड करण्याचे काही कारण नव्हते व तसा अधिकारही त्यांना नव्हता तरीही तो निर्णय त्यांनी घेतला. **-राजू शेट्टी,** स्वाभीमानी शेतकरी संघटना

> मी महायुती सोडली, कारण आमच्या १७ मागण्यांना त्यांनी वाटाण्याच्या अक्षता लावल्या. दिव्यांग मंत्रालय दिले मात्र पुढची काहीच कार्यवाही केली नाही. त्यामुळे त्यांच्याकडून काही भले होईल असे वाटले नाही. **-बच्चू कडू,** प्रहार अपंग क्रांती संघटना

> छत्रपती शाहू महाराज यांच्या निवडणुकीत मी त्यांचा मुलगा म्हणून माझे पूर्ण योगदान दिले. ते विजयी झाल्यावर मी काँग्रेसबरोबर कोणताही संबध ठेवलेला नाही. स्वराज्य पक्ष व आता परिवर्तन महाशक्ती यांचेच काम आम्ही करतो आहोत व तेच करणार आहोत. **-छत्रपती संभाजी राजे,** स्वराज्य पक्ष

# चिखली परिसरातील समस्या दहा वर्ष ‘जैसे थे ‘

## गव्हाणे : रेडझोन, पाणी, रस्ते समस्या सोडवण्यासाठी प्राधान्य देणार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिखली, ताम्हाणे वस्ती, म्हेत्रे वस्ती परिसरातील मूलभूत समस्या गेली दहा वर्ष ‘जैसे थे आहेत. रेड झोनची टांगती तलवार, अपुरा आणि अनियमित पाणीपुरवठा, खड्डे पडलेले रस्ते आणि वारंवार खंडित होणारा वीज पुरवठा अशा समस्यांनी नागरिक अक्षरशः वैतागले आहेत. हे प्रश्न सोडवण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न केले जातील असे स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे म्हणाले.**



चिखली, ताम्हाणे वस्ती, म्हेत्रे वस्ती परिसरातील नागरिक, ग्रामस्थ, सोसायटी धारक तसेच उदयोजकांची भेट (दि 17)घेत अजित गव्हाणे यांनी त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. गव्हाणे यावेळी म्हणाले चिखली, ताम्हाणे वस्ती, म्हेत्रे वस्ती परिसरातील नागरिकांशी संवाद साधल्यानंतर या भागातील मुख्य समस्या रस्त्यांची असल्याचे नागरिकांनी सांगितले. लघुउद्योजक तर रस्ते आणि खंडित वीज पुरवठ्यामुळे अतिशय त्रस्त आहेत. चिखली, मोशी, तळवडे या परिसरात मोठ्या प्रमाणात लघु उद्योग आहेत. या कंपन्यांपर्यंत जाण्यासाठी चिखली, ताम्हाणे वस्ती, म्हेत्रे वस्ती या भागाचा ये जा करण्यासाठी उपयोग करावा लागतो.

या भागात शहरातून अनेक जण कामानिमित्त येतात. या भागाला प्राधान्याने रस्ते, वीज, पाणी या मूलभूत सुविधा पुरवणे गरजेचे होते. मात्र गेल्या दहा वर्षात याकडे अतिशय मोठे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येत आहे. या भागात दररोज वाहतूक कोंडीची समस्या जाणवते. याबाबत नागरिकांनी वारंवार तक्रारी केल्या मात्र याकडे दुर्लक्ष झालेच.

शिवाय अद्यापही विकास आराखड्यातील रस्ते विकसित करण्यात सत्ताधाऱ्यांना यश आलेले नाही.

वीज यंत्रणा सक्षम करण्याबाबत ठोस उपाय योजना सत्ताधाऱ्यांनी केलेल्या नाहीत. गेल्या दहा वर्षात रेड झोन बाबत पाठपुरावा झाला नाही. त्यामुळे कारवाईची टांगती तलवार नागरिकांच्या डोक्यावर कायम आहे. या सर्व गोष्टींना वैतागलेल्या नागरिकांनी परिवर्तन करण्याचे ठरवले आहे.

### रेड झोन बाबत पाठपुरावा झाला नाही

रस्ते, वीज, पाणी या मूलभूत सुविधा पुरवणे गरजेचे होते. मात्र गेल्या दहा वर्षात याकडे अतिशय मोठे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येत आहे. या भागात दररोज वाहतूक कोंडीची समस्या जाणवते. याबाबत नागरिकांनी वारंवार तक्रारी केल्या मात्र याकडे दुर्लक्ष झालेच.शिवाय अद्यापही विकास आराखड्यातील रस्ते विकसित करण्यात सत्ताधाऱ्यांना यश आलेले नाही. वीज यंत्रणा सक्षम करण्याबाबत ठोस उपाय योजना सत्ताधाऱ्यांनी केलेल्या नाहीत. गेल्या दहा वर्षात रेड झोन बाबत पाठपुरावा झाला नाही. त्यामुळे कारवाईची टांगती तलवार नागरिकांच्या डोक्यावर कायम आहे.

> खोटं बोल पण रेटून बोल अशी मानसिकता येथील भाजप आमदारांची आहे. मात्र अशा भूलथापांना आता नागरिक बळी पडणार नाही. नागरिक परिवर्तन करण्याच्या मनस्थितीत असून भोसरी मतदारसंघात परिवर्तन अटळ आहे.
> **-अजित गव्हाणे,** माजी अध्यक्ष, स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महापालिका

## विधानसभेची रणधुमाळी! : मतदार नोंदणी अभियानाला प्रतिसाद

# शहरात 5 वर्षांत वाढले 3 लाख मतदार!

### पिंपरी-चिंचवडमध्ये 16 लाख 43 हजार 822 इतकी मतदार संख्या

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**विधानसभेची रणधुमाळी सुरू झालेली आहे. निवडणूक आयोगाने मतदार जाहीर केले आहेत. पिंपरी-चिंचवड शहरामध्ये गेल्यावेळी २०१९ ला १३ लाख ६३ हजार ५६१ मतदार होते. तर आजअखेर १६ लाख ४३ हजार ८२२ मतदार नोंद आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये शहरातील पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघांमध्ये ३ लाख ७९ हजार २६१ मतदारांची भर पडली आहे. वाढत्या शहरीकरणामुळे मतदारांत भर पडली आहे.**



पिंपरी-चिंचवड औद्योगिकनगरी आहे. शहरामध्ये पिंपरी, चिंचवड आणि भोसरी हे तीन पूर्ण आणि मावळ आणि मुळशीचा काही भाग आहे. निवडणूक आयोगाच्या वतीने मतदारसंघांमध्ये निरंतर मतदार नोंदणी अभियान राबविले जाते. त्यास प्रतिसाद मिळाला आहे.

#### दीड महिन्यात 8654 मतदारांची नोंद

निवडणूक आयोगाच्या वतीने ३० ऑगस्टपर्यंत मतदार नोंदणी आणि आजअखेरपर्यंत मतदार नोंदणी करण्यात आली. दीड महिन्यात वाढ झाली आहे. चिंचवड विधानसभा मतदारसंघांमध्ये ४३९७ तर पिंपरी विधानसभा मतदारसंघांमध्ये ८६१, भोसरी विधानसभा मतदारसंघांमध्ये ३३९६ नवमतदार, मावळ मतदारसंघांमध्ये ३१८६ नवीन मतदारांची नोंद आहे. दीड महिन्यामध्ये तीन विधानसभा ८६५४ मतदारसंघांमध्ये मतदारांची भर पडली आहे.



#### शहरीकरण, नागरिकीकरणामुळे मतदार वाढले

पिंपरी चिंचवड औद्योगिकनगरी आहे. तसेच या भागात मोठ्या प्रमाणावर नोकरी आणि व्यवसायासाठी देश आणि राज्याच्या कानाकोपऱ्यातून नागरिक वास्तव्यास आलेले आहेत. तसेच नवीन उपनगरांमध्ये मोठ्या प्रमाणावर गृहनिर्माण संस्था निर्माण झालेल्या आहेत. त्यामुळे लोकसंख्या आणि मतदारवाढीचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येत आहे. तसेच तळेगाव आणि चाकण, हिंजवडी औद्योगिक परिसर शहरालगत आहे, दळणवळणाची साधने उपलब्ध आहेत. त्यामुळेही मतदारसंख्या वाढली आहे.

---

## भोसरीकरांचा तुम्ही अपमान केला; स्वाभिमान दुखावला!

### मिशन विधासनभा : आ. महेश लांडगे यांचे विरोधकांवर टिकास्त्र : भोसरीतील मेळाव्यात समर्थकांचा विजयाचा निर्धार

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**"१० वर्षांत काय केले?" असा प्रश्न विचारणाऱ्यांना मी सांगणार आहे. शास्तीकर सरसकट माफ झाला आणि तुम्ही व तुमचे कुटुंबीय त्याचे लाभार्थी आहेत. आतापर्यंत मी कुणाचे नाव घेतले नाही. मात्र, आता भर चौकात नाव घेवून सांगणार कुणाचा किती शास्तीकर माफ झाला. 'भोसरीत राहण्याची लाज वाटते' असा आरोप तुम्ही केला. त्यामुळे आम्हा भोसरीकरांचा स्वाभिमान दुखावला आहे. मी माफ केले असते. पण, माझ्या भोसरी गावचे नाव बदनाम करायला नको होते, असे टिकास्त्र आमदार महेश लांडगे यांनी सोडले आहे.**



विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने भोसरी गावठाण येथील महेशदादा स्पोर्ट्स फाऊंडेशनच्या मैदानावर निवडणूक नियोजनाबाबत भोसरीतील ग्रामस्थ व सहकाऱ्यांची बुधवारी बैठक घेण्यात आली. या बैठकीचे सभेत रुपांतर झाले.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, आपण राजकारणात आहोत. तुम्ही मला बदनाम करा. मात्र, एव्हढी पातळी सोडू नका. ज्या गावात आपण राहतो. त्या गावाला बदनाम करु नका. आपण ज्या संस्कारात, विचारांत वाढतो. त्याचा अनादर करु नका. कुठेही बोलताना भोसरीबद्दल आपल्याला आदरच पाहिजे. भोसरी माझा स्वाभिमान आहे. माझ्या स्वाभिमानाला कोणी धक्का लावेल, तर त्याला जश्यास तसे उत्तर देणार आहे.निवडणूक जिंकायची म्हणून घाणेरडे राजकारण सुरू आहे. भोसरीच्या मातीत समोरच्याला उचलून टाकणारे पैलवान तयार होतात. समोरच्याला चावणारे नाही. मलाही लाज वाटते, तुमच्यासारखी माणसे भोसरीत जन्माला आली.

#### विकासाच्या मुद्यांवर निवडणूक लढवणार...

"१० वषे निरंतर विश्वासाची... शाश्वत विकासाची" या घोषवाक्याच्या आधारे आम्ही निवडणुकीला सामोरे जात आहोत. आम्ही केलेली विकासकामे, राबवलेले महत्त्वाकांक्षी प्रकल्प आणि महाविकास आघाडीच्या अडीच वर्षांच्या सत्ताकाळात माझे सहकारी, पदाधिकारी यांची झालेली अडवणूक आणि रखडलेले प्रकल्प यासह महायुती सरकारच्या सत्ताकाळात मार्गी लावलेले प्रकल्प अशा या मुद्यांच्या आधारे आम्ही लोकांसमोर 'रिपोर्ट कार्ड' घेऊन माय-बाप जनतेसमोर जाणार आहोत, असा संकल्प या बैठकीत करण्यात आला आहे, असेही आमदार महेश लांडगे यांनी म्हटले आहे.

> "महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची आचार संहिता सुरू झाली. ज्या गावातून माझ्या सामाजिक-राजकीय वाटचालीची सुरूवात झाली. त्या ग्रामदैवत भैरवनाथ महाराजांच्या आशिर्वादाने माझ्या गावातील सर्व सहकारी, आप्तेष्ट यांनी निवडणूक प्रचार तयारी आणि जबाबदारी याबाबत बैठकीचे नियोजन केले. या बैठकीला अक्षरश: सभेचे स्वरुप प्राप्त झाले. "एका हाकेवर जमा होणारी ही जीवाभावी माणसं..." हीच माझी ताकद आहे.
>
> **– महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# क्लिष्टतांचे तिमिर जावो...



भूमिका

**आयकर कायदा हा संक्षिप्त, वाचायला व कळायला सोपा आणि सुबोध व्हावा यासाठी संपूर्ण आयकर कायद्याचाच सर्वंकष आढावा घेतला जाईल, असे अर्थमंत्र्यांनी जाहीर केले आहे. पण त्यासाठीची प्रक्रिया पाहता हे सगळे कसे घडणार, असा प्रश्न पडतो.**

सध्या प्रचलित असलेल्या आयकर कायद्याने त्याच्या वयाची साठी ओलांडली आहे. इन्कम टॅक्स ॲक्ट १९६१ याच नावाने तो अजूनही ओळखला जातो. त्याआधी १९२२ सालचा आयकर कायदा होता. त्याहीआधी १८६० पर्यंत मागे जावे लागते. अशा अर्थाने, भारतीय आयकराच्या प्रचलित संकल्पनेने व त्यासंबंधित कायदा परंपरेने आता १६० वर्षांचा टप्पा ओलांडला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात वेळोवेळीच्या प्रत्येक सरकारने, त्यांच्या प्रत्येक वर्षीच्या अर्थसंकल्पातील वित्त विधेयकांतून, या कायद्यात आत्तापर्यंत एवढ्या मोठ्या संख्येत बदल केले आहेत की जणू तो एक जागतिक विक्रमच ठरावा. दरवर्षी असे बदल करून आता बहुधा सरकार व प्रशासन, हे दोघेही कंटाळले असावेत. म्हणूनच बहुदा त्यांनी आता ठरवले आहे की या पूर्ण कायद्याबाबत एकदा काय तो संपूर्ण विचार करू या. अर्थात याआधीच्या सरकारांनीही काही वेळा अशा घोषणा केल्या होत्या व त्याबाबत काही कामही झाले होते. एकदा तर डायरेक्ट टॅक्स कोड या नावाने त्याचे बारसे होऊन प्रारूपही




तयार झाले होते. ते असो.आपल्या अर्थमंत्र्यांनी या वर्षीच्या जुलैमधील अर्थसंकल्पीय भाषणात नमूद केले आहे की, आपल्या देशातील आयकरविषयक विवाद सातत्याने वाढत आहेत आणि त्यांच्या वाढीच्या तुलनेत त्यांच्या निपटाऱ्याचा वेग कमी पडत आहे. त्यासाठी 'विवाद से विश्वास' ही तडजोड योजना चारच वर्षांनंतर पुन्हा एकदा आणत आहोत. त्याच भाषणात त्यांनी अशीही घोषणा केली की आता या संपूर्ण आयकर कायद्याचाच सर्वंकष आढावा (कॉम्प्रिहेन्सिव्ह रिव्ह्यू) घेतला जाईल. आयकर कायदा हा संक्षिप्त, वाचायला व कळायला सोपा आणि सुबोध (ल्यूसिड) व्हावा हा त्यामागील हेतू आहे असे त्यांनी नमूद केले. त्यामुळे करविवाद कमी होतील व करदात्यांना आयकराविषयीची निश्चितता ( TAX CERTAINTY) अनुभवास येईल असेही त्यांनी सांगितले. हे सगळे निश्चितच स्वागतार्ह आहे. त्याच भाषणात त्यांनी असेही म्हटले की हे काम पुढील सहा महिन्यांत पूर्ण व्हावे असे प्रस्तावित आहे. त्यामुळे या घोषणेमागील गांभीर्यही ठळकपणे अधोरेखित केले गेले. जानेवारीपर्यंत हे काम पूर्ण करायचे या दृष्टीने संबंधित रचना या अगदी लगेचच तयार केल्या जातील, किंबहुना त्या रचनांचे प्रारूप तयारच असेल, असे वाटत होते. पण काहीशा उशिराने, या ऑक्टोबर महिन्यात, सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस यांच्याकडून त्यासंबंधी एक जाहीर निवेदन प्रसिद्ध करण्यात आले आहे.सदर निवेदन हे 'प्रेस रिलीज' स्वरूपाचे आहे. ते वाचतानाच, या विषयाबाबत उंचावलेल्या अपेक्षा काही प्रमाणात खाली येऊ शकतात. कारण त्यात असे म्हटले आहे की, या कामासाठी आयकर खात्याच्याच अंतर्गत एक समिती गठित करण्यात आली आहे. म्हणजे या समितीत तेच किंवा त्याच प्रकारचे आयकर खात्यातील अधिकारी असणार आहेत ज्यांनी, किंवा ज्यांच्या पूर्वसुरींनी, वर्षानुवर्षे हा कायदा सुचवला/ लिहिला आहे, बदलत आणला आहे आणि पुरेसा जटिलही करून ठेवला आहे. या समितीमध्ये आयकराशी संबंधित, पण प्रशासनाबाहेरील तटस्थ, अनुभवी तज्ज्ञ व्यक्तींचा अंतर्भाव नसणार असे दिसत आहे. आपल्या देशात अनेक नामांकित व्यावसायिक आयकर सल्लागार व कर-वकील (टॅक्स ॲडव्होकेट्स) आहेत. त्यांचे प्रतिनिधी, तसेच करदात्यांच्या संघटनांचे प्रतिनिधी, अशांचा या समितीत समावेश असता तर तो खूपच उपयुक्त ठरला असता असे वाटते. असो.समितीमध्ये करदात्यांच्या प्रतिनिधींचा प्रत्यक्ष समावेश नसला तरी, ही समिती सर्व लोकांचे म्हणणे ऐकून घेणार आहे असे समजल्याने सुरुवातीला खूप समाधान वाटले. सदर समितीने सर्वसामान्य जनतेकडून 'इनपुट्स' तसेच सूचना मागवल्या आहेत. एकूण चार प्रकारच्या सूचना आमंत्रित केल्या आहेत. भाषा सुलभीकरणाबाबतच्या सूचना, करविवाद कमी करण्याबाबतच्या सूचना, कायदेशीर पूर्तता कमी करण्याबाबतच्या सूचना आणि कालबाह्य/ अनावश्यक तरतुदी कमी करण्याबाबतच्या सूचना अशा चार विभागांतच या सूचना अपेक्षित आहेत.

## संपादकीय »

### को जागर्ति?

***राज्याचा इतका रुंद आणि खोल सामाजिक, सांस्कृतिक आणि अर्थातच राजकीय दुभंग या महाराष्ट्राने आता इतका कधीच अनुभवलेला नसेल...***

सत्ताधाऱ्यांस विविध जनकल्याण योजना जाहीर करण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल याची खातरजमा करून, विविध घोषणांचा बार वेळेत उडेल याची पुरेशी दक्षता घेऊन, पंतप्रधानादी मान्यवरांचे दौरे यथासांग पार पडतील हे पाहून महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका जाहीर होतील, असे म्हटले जात होते. निवडणूक आयोगाने आपल्या कृतीने हा अंदाज रास्त ठरवला. अखेर निवडणुकीची घोषणा झाली. त्यामुळे बाकी कोणी नाही तरी निदान ज्यांच्यावर राज्य सरकारच्या तिजोरीची जबाबदारी आहे, त्यांनी तरी सुटकेचा नि:श्वास सोडला असेल. गेले काही दिवस संबंधित खात्याच्या कर्मचाऱ्यांस अहोरात्र काम करावे लागले असणार. राज्याचे नेतृत्व अनेकानेक कल्पक योजनांची खैरात करण्यात मशगूल असल्यामुळे अंतिमत: तिजोरीत किती वेगाने खडखडाट होईल, याचा जमाखर्च या अधिकाऱ्यांस सातत्याने करावा लागला असणार.

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीची घोषणा एखाद-दोन दिवसांत होऊ शकेल असे दिसते. हरियाणा भाजपने जिंकले असल्यामुळे महाराष्ट्रातील निवडणुकीला वेगळेच महत्त्व आलेले आहे. इथे एक बदल झालेला पाहायला मिळेल असे वाटते. लोकसभा निवडणुकीमध्ये ना राम-संबंधित मुद्दा चालला ना मोदी.

# राज्यातील निवडणुकीत मोदी-शहांकडे लक्ष!

हरियाणात भाजपने मोदींवर अवलंबून न राहता निवडणूक लढवली आणि विजयही मिळवला. पण, महाराष्ट्रामध्ये भाजपला कदाचित नको असले तरीही मोदी जोरदार प्रचार करणार हे नक्की! त्याचा महायुतीला किती फायदा होईल हा भाग वेगळा; पण भाजपवरील आपली पकड अजूनही तितकीच घट्ट आहे हे मोदी महाराष्ट्रातील निवडणुकीच्या निमित्ताने सिद्ध करू पाहतील. मध्यंतरीच्या काळात मोदींविरोधात भाजपमधील काही ज्येष्ठ नेते उघडपणे बोलू लागले होते, राज्यात येऊन मोदी त्यांना चपराक देण्याची शक्यता नाकारता येत नाही. या निवडणुकीत कोणती आघाडी वा युती जिंकेल हे फारसे महत्त्वाचे नाही, प्रचारामध्ये मोदी-शहा काय करतात हे पाहण्याजोगे असेल. हरियाणातील निकालाआधी राज्यात विरोधकांच्या महाविकास आघाडीला तुलनेत अनुकूल परिस्थिती होती असे मानले जात होते. पण ही निवडणूक एकतर्फी होईल आणि महाविकास



आघाडीला मोकळे रान मिळेल असे कोणीही म्हणत नव्हते. लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीला जास्त जागा मिळाल्या आणि भाजपला अनपेक्षितपणे कमी जागांवर समाधान मानावे लागले होते. त्यामुळे विधानसभा निवडणुकीतही त्याची पुनरावृत्ती होण्याची शक्यता असेल अशी चर्चा होत होती. मध्यंतरीच्या काळात महायुतीतील घटक पक्षांमध्ये तीव्र झालेल्या मतभेदांमुळेही महाविकास आघाडीला सत्ता मिळू शकते असे बोलले जाऊ लागले. महायुतीतील संघर्ष अजूनही थांबलेला नाही. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची झालेली कोंडी कोणीही नाकारू शकत नाही. अजित पवारांच्या गटाला ना महायुतीतून बाहेर पडून काही मिळेल ना महायुतीत राहून फार काही हाती लागेल असे जाणकारांचे म्हणणे होते. असे असले तरी प्रतिकूल परिस्थितीत राजकारणामध्ये टिकून राहणे हेदेखील मोठी गोष्ट असते. सध्या अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस राजकारणात टिकून राहण्याला अधिक प्राधान्य देत असल्याचे मानले जाते.

महायुतीमध्ये शिवसेनेच्या शिंदे गटाने जबरदस्त बाजी मारली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विनंतीवरून पंतप्रधान मोदी थेट ठाण्यात जाऊन जाहीर सभा घेतात. इथेच शिंदेंचे महायुतीतील महत्त्व स्पष्ट होते. खरे तर महायुतीमध्ये शिंदे गट भाजप आणि अजित पवार गटाला शिरजोर झाला आहे, ही बाब दोन्ही पक्षांना रुचलेली नाही. अगदी संघालादेखील शिंदे गट पसंत आहे असे नव्हे. पण, मोदी-शहांची शिंदेंना पसंती असल्यामुळे राज्यातील भाजपच्या नेत्यांना शिंदे गटाविरोधात काही करता येते ना अजित पवार गटाला!

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# सरकारची प्रतिमा मलिन होतेय!

## किक्रेटपटूंना जाहीर केलेलं बक्षीस अद्यापही दिलं नाही

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जून महिन्यात टी-२० विश्वचषक स्पर्धा जिंकल्यानंतर महाराष्ट्र सरकारने भारतीय संघातील खेळाडूंचा सत्कार केला होता. तसेच त्यांना ११ कोटी रुपयांचे बक्षिस जाहीर केलं होतं. त्यावेळी सरकारच्या या निर्णयाची बरीच चर्चाही झाली होती. मात्र, आता भारतीय संघातील खेळाडूंना बक्षिसांची ही रक्कम अद्यापही मिळाली नसल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केली आहे. तसेच त्यांनी यावरून राज्य सरकारवर टीकाही केली आहे.**



जितेंद्र आव्हाड यांनी एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत यासंदर्भात प्रतिक्रिया दिली. "भारतीय क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकल्यानंतर मुंबई आणि महाराष्ट्रात राहणाऱ्या विजेत्या संघातील खेळाडूंना कोट्यवधी रूपयांची बक्षिसे जाहीर केली. मात्र, ही रक्कम त्यांना अद्यापही मिळालेली नाही. काल आम्ही ज्या हॉटेलमध्ये मिटींगसाठी थांबलो होतो. त्या हॉटेलमध्ये विश्वचषक विजेत्या संघातील काही खेळाडू मला भेटले. बोलता-बोलता त्यांनी सांगितलं की आम्हाला जी बक्षिसे जाहीर करण्यात आली होती, ती अद्याप मिळालेली नाही. ही बाब खटकणारी आहे", असं जितेंद्र आव्हाड म्हणाले.पुढे बोलताना त्यांनी यावरून राज्य सरकारवर टीकाही केली. "माझी महाराष्ट्र सरकारला एवढीच विनंती आहे की, इथे – तिथे पैसे वाटतच आहात. तर ज्यांना कबूल केले आहेत. त्यांचे तरी पैसे वाटून टाका. जसे हे क्रिकेटपटू मला बोलले, तसे ते अनेकजणांना बोलले असतील. त्यातून सरकारची प्रतिमा मलिन होतेय, याचीच मला काळजी आहे", जून महिन्यात टी-20 विश्वचषक स्पर्धा जिंकल्यानंतर महाराष्ट्र सरकारने भारतीय संघातील खेळाडूंचा सत्कार केला होता. तसेच त्यांना ११ कोटी रुपयांचे बक्षिस जाहीर केलं होतं. त्यावेळी सरकारच्या या निर्णयाची बरीच चर्चाही झाली होती. मात्र, आता भारतीय संघातील खेळाडूंना बक्षिसांची ही रक्कम अद्यापही मिळाली नसल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केली आहे. तसेच त्यांनी यावरून राज्य सरकारवर टीकाही केली आहे. जितेंद्र आव्हाड यांनी एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत यासंदर्भात प्रतिक्रिया दिली. "भारतीय क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकल्यानंतर मुंबई आणि महाराष्ट्रात राहणाऱ्या विजेत्या संघातील खेळाडूंना कोट्यवधी रूपयांची बक्षिसे जाहीर केली. मात्र, ही रक्कम त्यांना अद्यापही मिळालेली नाही. काल आम्ही ज्या हॉटेलमध्ये मिटींगसाठी थांबलो होतो. त्या हॉटेलमध्ये विश्वचषक विजेत्या संघातील काही खेळाडू मला भेटले. बोलता-बोलता त्यांनी सांगितलं की आम्हाला जी बक्षिसे जाहीर करण्यात आली होती, ती अद्याप मिळालेली नाही. ही बाब खटकणारी आहे", असं जितेंद्र आव्हाड म्हणाले.पुढे बोलताना त्यांनी यावरून राज्य सरकारवर टीकाही केली. "माझी महाराष्ट्र सरकारला एवढीच विनंती आहे की, इथे – तिथे पैसे वाटतच आहात. तर ज्यांना कबूल केले आहेत. त्यांचे तरी पैसे वाटून टाका. जसे हे क्रिकेटपटू मला बोलले, तसे ते अनेकजणांना बोलले असतील. त्यातून सरकारची प्रतिमा मलिन होतेय, याचीच मला काळजी आहे", असं जितेंद्र आव्हाड म्हणाले. दरम्यान, टी-२० विश्वचषकावर नाव कोरल्यानंतर राज्य सरकारने विधीमंडळात मुंबईकर खेळाडू रोहित शर्मा, सुर्यकुमार यादव, त्यांनतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भारतीय क्रिकेट संघासाठी ११ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. "भारत हा क्रिकेटमध्ये विश्वगुरू आहे. हे आपल्या टी-२० विश्वचषक विजेत्या संघाने सिद्ध केलं आहे. पराभवाच्या छायेतून विजय खेचून आणून कर्णधार रोहित शर्मा आणि त्याच्या संघाने भारतीयांची छाती अभिमानाने फुलून यावी, अशी कामगिरी केली आहे.

### त्यांचे तरी पैसे वाटून टाका

मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटलं होतं.असं जितेंद्र आव्हाड म्हणाले. दरम्यान, टी-२० विश्वचषकावर नाव कोरल्यानंतर राज्य सरकारने विधीमंडळात मुंबईकर खेळाडू रोहित शर्मा, सुर्यकुमार यादव, शिवम दुबे आणि यशस्वी जैस्वाल यांचा सत्कार आयोजित केला होता. त्यांनतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भारतीय क्रिकेट संघासाठी ११ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. "भारत हा क्रिकेटमध्ये विश्वगुरू आहे. हे आपल्या टी-२० विश्वचषक विजेत्या संघाने सिद्ध केलं आहे. पराभवाच्या छायेतून विजय खेचून आणून कर्णधार रोहित शर्मा आणि त्याच्या संघाने भारतीयांची छाती अभिमानाने फुलून यावी, अशी कामगिरी केली आहे.

# फुल स्विंगमध्ये महायुतीचं सरकार येईल?

## शरद पवारांचे दौरे वाढले आहेत त्याचा त्यांनी विचार करावा

। अमरावती ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महाराष्ट्र विधासभा निवडणूक अवघ्या महिन्याभरावर आली आहे. प्रचाराचा जोर सुरु झाला आहे. १५ ऑक्टोबरच्या दिवशी निवडणूक आयोगाने निवडणूक जाहीर केली आहे. २० नोव्हेंबरला महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक तर २३ नोव्हेंबरला निकाल लागणार आहे. ही घोषणा होताच महाराष्ट्रात आचारसंहिताही लागू झाली आहे. यानंतर महायुती सरकारने त्यांचं अडीच वर्षांचं रिपोर्ट कार्ड सादर केलं.**




विजय कुणाचा होणार? हा प्रश्न विचारला असता खासदार उदयनराजेयांनी त्यांच्या खास शैलीत उत्तर दिलं आहे.आम्ही आमचं काम करत आहोत. मी आणि शिवेंद्र राजे आम्ही अनेक कामं मार्गी लावली आहेत. आमचं काम हाच आमचा अजेंडा आहे. जिल्ह्यातल्या प्रत्येक मतदारसंघात मी फिरणार आहेच तसंच जिथे गरज लागेल तिथेही मी प्रचार करणार आहे. महाराष्ट्रात कुणाचं सरकार येईल? असं विचारलं असता उदयनराजेम्हणाले, "महाराष्ट्रात फुल स्विंग आणि फुल स्विपध्ये महायुतीचं सरकार येईल. विरोधक योजनांवर टीका करत आहेत कारण त्यांच्याकडे बोलण्यासाठी मुद्देच नाहीत. जर योजनांना हे नावं ठेवत आहेत तर त्यांनी त्या योजना का आणल्या नाही? स्वतः कुठल्या योजना आणायच्या नाहीत. दुसऱ्याने आणल्या तर त्याला नावं ठेवायची आणि टीका करत बसायची एवढंच यांना (विरोधक) जमतं.

### त्यांना दौरे वाढवावे लागत आहेत

" असंही उदयनराजे ( UDAYANRAJE ) म्हणाले. तसंच त्यांनी शरद पवारांबाबतही भाष्य केलं.शरद पवारांचे पश्चिम महाराष्ट्रातले दौरे वाढले आहेत तर वाढू द्या. लोकशाही त्यांना दौरे काढण्याचा अधिकार आहे. मात्र दौरे का वाढले आहेत? याचा विचार त्यांनी केला पाहिजे. त्यांनी कामं केली का? ती केली असती तर इतके दौरे करावे लागले नसते. कृष्णा खोऱ्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प होता, त्यावेळी शरद पवारांनी तो केला नाही? त्यांनी तो का केला नाही? शरद पवारांनी कामं केली असती तर त्यांना सांगता आली असती. ती नाहीत म्हणून त्यांना दौरे वाढवावे लागत आहेत.

# बिश्नोईमुळे भारत-कॅनडा वाद चिघळला!

## परराष्ट्र मंत्रालयाचे ट्रुडो सरकारवर मोठे आरोप

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि कॅनडामध्ये गेल्या वर्षभरापासून तणावाचं वातावरण आहे. खलिस्तानी दहशतवादी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येमागे भारताचा हात असल्याचा आरोप कॅनडाने वर्षभरापूर्वी केला होता. त्यानंतर भारताने कॅनडाचे आरोप फेटाळून लावले होते. यातच कॅनडाने पुन्हा एकदा या प्रकरणाचा उल्लेख करत भारतीय उच्चायुक्त संजय कुमार वर्मा आणि इतरांचा या प्रकरणाच्या तपासात सहभाग असल्याचा आरोप केला, या आरोपानंतर भारताने एक पत्रक जारी करत कॅनडाने केलेले आरोप पूर्णपणे फेटाळून लावले. त्यापाठोपाठ आता भारताने कॅनडाच्या उच्चायुक्तांसह ६ राजनैतिक अधिकाऱ्यांना १९ ऑक्टोबर २०२४ पर्यंत भारत सोडण्याचे आदेश जारी केले आहेत. तसेच संजय वर्मा यांना परत मायदेशी बोलावले आहे. तसेच कॅनडातील इतर राजनैतिक अधिकाऱ्यांना मायदेशी बोलावलं आहे.**





भारत आणि कॅनडामधील राजनैतिक तणावादरम्यान संघटित गुन्हेगारीशी संबंधित प्रकरणं हाताळताना, अशा गुन्हेगारांबरोबरच्या कॅनडाच्या भूमिकांवर भारताने चिंता व्यक्त केली आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी गुरुवारी कॅनडावर गंभीर आरोप केला की भारतातील गुन्हेगारांची कुख्यात टोळी लॉरेन्स बिश्नोई टोळीतील गुन्हेगारांचे प्रत्यार्पण करण्यास कॅनडा सरकार तयार नाही. बिश्नोई टोळीतील अनेक गुन्हेगार कॅनडामधील गुन्ह्यांच्या प्रकरणात सामील आहेत. परराष्ट्र मंत्रालयाने सांगितलं की कॅनडातील बिश्नोई टोळीतील अनेक सदस्यांच्या प्रत्यार्पणासाठी आम्ही कॅनडा सरकारशी अनेकदा बातचीत केली आहे. या गुन्हेगारांना भारताकडे सोपवावं अशी मागणी आम्ही सातत्याने करत आहोत. प्रतार्पणाच्या २६ विनंत्या गेल्या दशकभरापासून प्रलंबित आहेत. आम्हाला हे सांगायला खूप विचित्र वाटतंय की आम्ही ज्या गुन्हेगारांना कॅनडातून हद्दपार करण्यास सांगितलं होतं, त्यांच्यावर तिथल्या सरकारने कोणतीही कारवाई केली नाही. मात्र, आता त्या गुन्हेगारांनी कॅनडात उच्छाद मांडला आहे. ते आता तिथे गुन्हे करत आहे आणि कॅनडा सरकार त्यासाठी भारताला दोषी ठरवत आहे.जयस्वाल म्हणाले, आम्ही वेगवेगळ्या प्रसिद्धी पत्रकांद्वारे आमची भूमिका स्पष्ट केली आहे. सप्टेंबर २०२३ पासून त्यांनी (ट्रुडो) आमच्यावर जे-जे आरोप केले. त्यापैकी एकाही आरोपाप्रकरणी ट्रुडो सरकार पुरावे सादर करू शकलेलं नाही. काल रात्री आम्ही पुन्हा एकदा आमची बाजू मांडणारं प्रसिद्धी पत्रक जारी केली आहे. भारत आणि कॅनडामध्ये गेल्या वर्षभरापासून तणावाचं वातावरण आहे. खलिस्तानी दहशतवादी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येमागे भारताचा हात असल्याचा आरोप कॅनडाने वर्षभरापूर्वी केला होता. त्यानंतर भारताने कॅनडाचे आरोप फेटाळून लावले होते. यातच कॅनडाने पुन्हा एकदा या प्रकरणाचा उल्लेख करत भारतीय उच्चायुक्त संजय कुमार वर्मा आणि इतरांचा या प्रकरणाच्या तपासात सहभाग असल्याचा आरोप केला, या आरोपानंतर भारताने एक पत्रक जारी करत कॅनडाने केलेले आरोप पूर्णपणे फेटाळून लावले. त्यापाठोपाठ आता भारताने कॅनडाच्या उच्चायुक्तांसह ६ राजनैतिक अधिकाऱ्यांना १९ ऑक्टोबर २०२४ पर्यंत भारत सोडण्याचे आदेश जारी केले आहेत. तसेच संजय वर्मा यांना परत मायदेशी बोलावले आहे. तसेच कॅनडातील इतर राजनैतिक अधिकाऱ्यांना मायदेशी बोलावलं आहे. भारत आणि कॅनडामधील राजनैतिक तणावादरम्यान संघटित गुन्हेगारीशी संबंधित प्रकरणं हाताळताना, अशा गुन्हेगारांबरोबरच्या कॅनडाच्या भूमिकांवर भारताने चिंता व्यक्त केली आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी गुरुवारी कॅनडावर गंभीर आरोप केला की भारतातील गुन्हेगारांची कुख्यात टोळी लॉरेन्स बिश्नोई टोळीतील गुन्हेगारांचे प्रत्यार्पण करण्यास कॅनडा सरकार तयार नाही. बिश्नोई टोळीतील अनेक गुन्हेगार कॅनडामधील गुन्ह्यांच्या प्रकरणात सामील आहेत.

### भारताचं म्हणणं काय?

परराष्ट्र मंत्रालयाने सांगितलं की कॅनडातील बिश्नोई टोळीतील अनेक सदस्यांच्या प्रत्यार्पणासाठी आम्ही कॅनडा सरकारशी अनेकदा बातचीत केली आहे. या गुन्हेगारांना भारताकडे सोपवावं अशी मागणी आम्ही सातत्याने करत आहोत. प्रतार्पणाच्या २६ विनंत्या गेल्या दशकभरापासून प्रलंबित आहेत. आम्हाला हे सांगायला खूप विचित्र वाटतंय की आम्ही ज्या गुन्हेगारांना कॅनडातून हद्दपार करण्यास सांगितलं होतं, त्यांच्यावर तिथल्या सरकारने कोणतीही कारवाई केली नाही.ते आता तिथे गुन्हे करत आहे आणि कॅनडा सरकार त्यासाठी भारताला दोषी ठरवत आहे. जयस्वाल म्हणाले, आम्ही वेगवेगळ्या प्रसिद्धी पत्रकांद्वारे आमची भूमिका स्पष्ट केली आहे.

---

# मोदी पाकिस्तानात आले असते तर...

## पुढची 75 वर्ष वाया घालवायची नाहीत : नवाझ शरीफ

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पाकिस्तानमध्ये शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन अर्थात SCO च्या शिखर परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेसाठी भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी १६ ऑक्टोबर रोजी इस्लामाबाद, पाकिस्तानला भेट दिली.**



भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणावपूर्ण परिस्थितीनंतर हा दौरा महत्त्वपूर्ण असल्याचे मानले जाते. या दौऱ्यानंतर पाकिस्तानचे माजी पंतप्रधान नवाझ शरीफ यांनी इंडिया टुडेला मुलाखत दिली. एस. जयशंकर यांच्या दौऱ्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात नव्याने संवाद सुरू होण्याची आशा त्यांनी व्यक्त केली. तसेच मागचे सगळे विसरून भविष्यातील ऊर्जा आणि हवामान बदल या विषयांवर एकत्रित काम करता येऊ शकते, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.इंडिया टुडेशी संवाद साधताना नवाझ शरीफ यांनी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंधांना पुन्हा उभारी देण्याची गरज असल्याचे अधोरेखित केले. “आपण जिथून संवाद सोडला होता, तिथून तो पुन्हा चालू करायला हवा. मागच्या ७५ वर्षांत जे झाले, त्याचा विचार न करता आपल्याला पुढची ७५ वर्ष वाया घालवायची नाहीत”, असे ते म्हणाले.नवाझ शरीफ पुढे म्हणाले, “शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन बैठकीसाठी एस. जयशंकर आले, ही संवादाची सुरुवात आहे. पण जर नरेंद्र मोदी या बैठकीसाठी पाकिस्तानात आले असते तर आम्हाला अधिक आनंद झाला असता. आपण आपले शेजारी बदलू शकत नाहीत. पण आपण चांगले शेजारी म्हणून नक्कीच राहू शकतो.”दरम्यान एस. जयशंकर यांनी शांघाय ऑर्गनायझेशन बैठकीत बोलत असताना सीमेपलीकडून होणाऱ्या अतिरेकी कारवायांवर तोफ डागली. सीमेपलीकडून तीन प्रकारच्या राक्षसांना पोसले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. हे तीन राक्षस म्हणजे, दहशतवाद, कट्टरतावाद आणि फुटिरतावाद असल्याचे ते म्हणाले. या तिघांमुळे दोन्ही देशात व्यापार, दळणवळण आणि ऊर्जा वहन करण्यास अडचणी येतात, असेही ते म्हणाले. मुद्द्यावर इस्लामाबादमध्ये आयोजित करण्यात आलेल्या परिषदेमध्ये भारताकडून सहभाग घेतला होता. त्यानंतर थेट आता परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांचा हा दौरा आहे

### आपले शेजारी बदलू शकत नाही

“आपण जिथून संवाद सोडला होता, तिथून तो पुन्हा चालू करायला हवा. मागच्या ७५ वर्षांत जे झाले, त्याचा विचार न करता आपल्याला पुढची ७५ वर्ष वाया घालवायची नाहीत”, असे ते म्हणाले.नवाझ शरीफ पुढे म्हणाले, “शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन बैठकीसाठी एस. जयशंकर आले, ही संवादाची सुरुवात आहे. पण जर नरेंद्र मोदी या बैठकीसाठी पाकिस्तानात आले असते तर आम्हाला अधिक आनंद झाला असता. आपण आपले शेजारी बदलू शकत नाहीत.

# ‘तेरी बातों में ऐसा उलझा जिया’



शाहीद कपूर आणि क्रिती सेनॉन यांच्या मुख्य भूमिका असलेला ‘तेरी बातों में ऐसा उलझा जिया’ हा चित्रपट शुक्रवारी प्रेक्षकांच्या भेटीला आला. या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळतोय. हा रोमँटिक ड्रामा चित्रपट पाहण्यासाठी प्रेक्षकांची गर्दी पाहायला मिळत आहे. या चित्रपटात एका मराठी अभिनेत्रीने काम केलं आहे. तिने स्वतः याबद्दल पोस्ट शेअर करून माहिती दिली आहे.‘चला हवा येऊ द्या’ फेम स्नेहल शिदम ‘तेरी बातों में ऐसा उलझा जिया’ या चित्रपटात झळकली आहे. तिने शाहीद कपूरबरोबर स्क्रीन शेअर केली आहे. चित्रपटात तिचे शाहीदबरोबर सीन आहेत. “कळवायला उशीर आणि आनंद दोन्ही होतोय. शाहीद कपूर आणि क्रिती सेनॉन यांचा नवीन हिंदी सिनेमा “तेरी बातो में ऐसा उलझा जिया” नुकताच प्रदर्शित झाला आहे. यात माझी एक छोटीशी भूमिका आहे. तुमच्या जवळच्या चित्रपटगृहात जाऊन सिनेमा नक्की बघा आणि कसा वाटतोय ते सांगा. तुमचं प्रेम आणि आशीर्वाद असेच राहुद्या,” असं स्नेहलने इन्स्टाग्रामवर शाहीदबरोबरचा फोटो शेअर करत लिहिलं आहे.‘तेरी बातों में ऐसा उलझा जिया’ हा चित्रपट पाहणाऱ्या अनेक प्रेक्षकांना मराठमोळ्या स्नेहल शिदमला पडद्यावर पाहून आश्चर्याचा धक्का बसला आहे. अनेकांनी सोशल मीडियावर स्नेहलचे व्हिडीओ शेअर केले आहेत. स्नेहलचा हा पहिलाच चित्रपट आहे. पहिल्याच चित्रपटात शाहीद कपूरबरोबर स्क्रीन शेअर करणाऱ्या स्नेहलचं चाहते खूप कौतुक करत आहेत. तिने शेअर केलेल्या पोस्टवर कमेंट करून तिला चाहते व अभिनयक्षेत्रातील लोक शुभेच्छा देत आहेत.

# आमिरच्या चित्रपटात झळकणार जिनिलीया

आमिर खानच्या ‘लाल सिंग चड्ढा’ या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर अत्यंत निराशजनक कामगिरी केली होती. खरंतर, आमिरला बॉलीवूडचा मिस्टर परफेक्शनिस्ट म्हणून ओळखलं जातं. त्यामुळे अशा दमदार अभिनेत्याचे सलग चित्रपट फ्लॉप होणं हे आमिरसह त्याच्या चाहत्यांसाठी धक्कादायक होतं. ‘लाल सिंग चड्ढा’ फ्लॉप झाल्यावर त्याने अभिनयातून काही काळ ब्रेक घ्यायचं ठरवलं. परंतु, आता लवकरच आमिर पुन्हा एकदा प्रेक्षकांसह चाहत्यांचं मनोरंजन करण्यासाठी मोठ्या पडद्यावर पुनरागमन करणार आहे.आमिर बहुचर्चित ‘सितारे जमीन पर’ चित्रपटातून पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हा चित्रपट ‘कॅम्पिओन्स’चा हिंदी रिमेक असणार आहे. या चित्रपटासाठी आमिरने सर्वात आधी फरहान अख्तरला नायकाच्या भूमिकेसाठी ऑफर दिली होती पण, त्यानंतर अभिनेत्याने ही भूमिका स्वत: साकारण्याचा निर्णय घेतला. ‘सितारे जमीन पर’चं दिग्दर्शन आरएस प्रसन्ना यांनी केलं आहे. आता या चित्रपटात झळकणाऱ्या नायिकेचं नावंही समोर आलं आहे.पिंकव्हिलाने दिलेल्या रिपोर्टनुसार, अभिनेत्री जिनिलीया देशमुखने आमिर खानचा आगामी चित्रपट ‘सितारे जमीन पर’ साइन केला आहे. याशिवाय अभिनेत्रीने यासंदर्भात माहिती देणारी एक इन्स्टाग्राम स्टोरी देखील शेअर केली आहे. या स्टोरीमध्ये आमिर खानच्या प्रोडक्शन हाऊसची बॉटल पाहायला मिळत आहे. या फोटोला जिनिलीयाने “१६ वर्षांनंतर...” असं कॅप्शन दिलं आहे. यापूर्वी अभिनेत्रीने आमिरची निर्मिती असलेल्या ‘जाने तू या जाने ना’ चित्रपटासाठी काम केलं होतं. यामध्ये अभिनेत्याचा भाचा इम्रान खानने प्रमुख भूमिका साकारली होती.दरम्यान, ‘सितारे जमीन पर’ चित्रपटात आमिर खान, जिनिलीया देशमुखसह ‘तारे जमीन पर’ फेम दर्शील प्रमुख भूमिकेत झळकणार आहे. आता आमिर या चित्रपटासंदर्भात पुढील अपडेट्स केव्हा देणार याबाबत त्याच्या चाहत्यांच्या मनात उत्सुकता निर्माण झाली आहे.



# मोठा झाल्यावर तैमूर काय बनणार?

अभिनेता सैफ अली खान आणि करीना कपूरप्रमाणेच त्यांचा मोठा मुलगा तैमूर अली खान नेहमीच चर्चेत असतो. तैमूर लोकप्रिय स्टारकिड्सपैकी एक आहे. सोशल मीडियावर तैमूरचे अनेक फोटो व व्हिडीओ व्हायरल होत असतात. त्याचा एक फोटो घेण्यासाठी पापसाझींमध्ये चढाओढ होताना दिसते. चाहत्यांकडूनही तैमूरच्या फोटोंना मोठ्या प्रमाणात पसंती मिळत असते.तैमूरबाबात छोट्या मोठ्या गोष्टी जाणून घेण्यास चाहते मोठ्या प्रमाणात उत्सुक असतात. मोठा झाल्यावर तैमूर आई-बाबासारखाच अभिनय क्षेत्रात येणार का अनेकदा असा प्रश्न विचारला जातो. दरम्यान एका मुलाखतीत सैफ अली खान व करीनाने याबाबतचा खुलासा केला आहे. सैफ म्हणाला, तैमूला अभिनेता बनण्यात कोणताही रस नाही. त्याला फूटबॉल खेळाडू बनायचे आहे. त्यासाठी त्याला अर्जेंटीनाला जायचे आहे. तर करीना म्हणाली, त्याला गिटारिस्टही बनण्याची इच्छा आहे. तसेच त्याला मेस्सीसारखा प्रसिद्ध फूटबॉलपटूही बनायचे आहे.

# धर्मेंद्र यांनी केला नावात बदल

बॉलीवूडमधील ज्येष्ठ अभिनेते म्हणून धर्मेंद्र यांना ओळखले जाते. ७० च्या दशकात त्यांनी अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केले. आतापर्यंत त्यांनी तब्बल ३०० चित्रपटांमध्ये वेगवेगळ्या धाटणीच्या भूमिका साकारल्या आहेत. धर्मेंद्र यांचे संपूर्ण नाव धर्मेंद्र सिंह देओल आहे. मात्र, त्यांनी कधीच आपले पूर्ण नाव वापरले नाही. त्यांनी नेहमीच धर्मेंद्र हे पहिलेच नाव सगळीकडे वापरले. मात्र, आता तब्बल ६४ वर्षांनी त्यांनी आपल्या नावामध्ये बदल केला आहे. नुकताच शाहिद कपूर आणि क्रिती सेनॉन यांचा ‘तेरी बातों में ऐसा उल्झा जिया’ चित्रपट प्रदर्शित झाला.



# ‘रामायण’ चित्रपटातरकुल शूर्पणखाच्या भूमिकेत

गेल्या काही महिन्यांपासून रामायणावर आधारित ‘रामायण’ या चित्रपटाची चर्चा सुरू आहे. नितेश तिवारी दिग्दर्शित ‘रामायण’ या चित्रपटात अभिनेता रणबीर कपूर प्रभू श्रीरामाच्या भूमिकेसाठी निश्चित झाला आहे. तर सीतेच्या भूमिकेसाठी जान्हवी कपूर व दाक्षिणात्य अभिनेत्री साई पल्लवी यांच्या नावाची चर्चा सुरू आहे. पण अजूनपर्यंत सीतेच्या भूमिकेसाठी अभिनेत्री ठरलेली नाही. अशातच शूर्पणखाची भूमिका कोणती बॉलीवूड अभिनेत्री साकारणार हे समोर आलं आहे.नितेश तिवारी दिग्दर्शित ‘रामायण’ चित्रपटात शूर्पणखाच्या भूमिकेसाठी अभिनेत्री रकुल प्रीत सिंगच्या नावाची चर्चा सुरू आहे. ‘पिंकविला’च्या वृत्तानुसार, रकुल प्रीत सिंग शूर्पणखाच्या भूमिकेत पाहायला मिळू शकते. याविषयी चित्रपट निर्मात्यांमध्ये चर्चा झाली आहे. पण निर्मात्यांनी स्वतः याबाबत अधिकृतरित्या घोषणा केली नाहीये. त्यामुळे रकुल प्रीत सिंग शूर्पणखाच्या भूमिकेत पाहायला मिळणार, या अधिकृत घोषणेची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. माहितीनुसार, शूर्पणखा भूमिकेसाठी रकुलची टेस्ट पूर्ण झाली आहे. जर रकुलचं ही भूमिका साकारणार असल्याचं निश्चित झालं तर मग जॅकी भगनानीशी लग्न केल्यानंतरचा ‘रामायण’ हा तिचा पहिला चित्रपट असेल. दरम्यान, अभिनेत्री रकुल प्रीत सिंग जॅकी भगनानीबरोबर २१ फेब्रुवारीला लग्नबंधनात अडकणार असल्याचं म्हटलं जात आहे. गोव्यात मोठ्या थाटामाटात दोघांचं लग्नसोहळा असणार आहे.

# आफ्रिकन संघाने घेतला बदला!

## दक्षिण आफ्रिकेचा संघ वर्ल्डकपच्या अंतिम फेरीत

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**महिला टी-२० विश्वचषक २०२४ मध्ये दक्षिण आफ्रिकेच्या संघाने ऑस्ट्रेलियाच्या महिला संघाला पराभूत करत अंतिम फेरीत धडक मारली आहे. टी-२० विश्वचषकातील गट सामन्यांमध्ये अपराजित राहिलेल्या ऑस्ट्रेलियाला उपांत्य फेरीत मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. विक्रमी सहा वेळा वर्ल्डकप जिंकणाऱ्या ऑस्ट्रेलियाला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. सुरूवातीपासूनच सामन्यात दबदबा राखत दक्षिण आफ्रिकेने ८ विकेट्सने दणदणीत विजय मिळवला.**




या विजयासह दक्षिण आफ्रिकेचा संघ सलग दुसऱ्यांदा टी-२० विश्वचषकाच्या अंतिम फेरीत पोहोचला आहे. गतवर्षीच्या महिला टी-२० विश्वचषकाच्या अंतिम फेरीत ऑस्ट्रेलियाने आफ्रिकेचा पराभव केला होता. यंदा उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाला बाहेर करत दक्षिण आफ्रिकेने मोठा बदला घेतला आहे. २०२३ मध्ये, केप टाऊनमधील न्यूलँड्स येथे झालेल्या फायनलमध्ये सन लुसचा दक्षिण आफ्रिका मेग लॅनिंगच्या ऑस्ट्रेलियाकडून १९ धावांनी पराभूत झाला होता.लॉरा वोल्वार्ड्या नेतृत्वाखालील महिला संघाने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पराभवाचा बदला घेतला, ऑस्ट्रेलियाची कर्णधार एलिसा हिली पायाच्या दुखापतीमुळे सामन्यातून बाहेर होती. या विजयासह दक्षिण आफ्रिकेनेही महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेत ऑस्ट्रेलियाला आठ सामन्यांमध्ये पराभूत केले. त्यांनी या स्पर्धेत ऑस्ट्रेलियाच्या सलग १५ सामन्यांच्या विजयी मालिकेला पूर्णविराम लावला.ऑस्ट्रेलियाने दिलेल्या १३५ धावांच्या प्रत्युत्तरात आफ्रिकेने चांगली सुरूवात केली. कर्णधार सलामीवीर लोरा वोल्वार्ड हिने उत्कृष्ट ४२ धावांची खेळी केली तर ब्रिट्स १५ धावा करत बाद झाली. यानंतर सामनावीर ठरलेल्या ॲनेके बॉश हिने ४८ चेंडूत ८ चौकार आणि एका षटकारासह ७४ धावांची शानदार खेळी करत संघाच्या विजयात मोठी भूमिका बजावली. विजयी चौकार लगावत बॉशने आफ्रिकेने अंतिम फेरीत धडक मारली. ऑस्ट्रेलियाकडून सदरलँडला फक्त दोन विकेट घेता आले. याशिवाय ऑस्ट्रेलियाची गोलंदाजी बाजू चांगली कामगिरी करू शकली नाही.दक्षिण आफ्रिकेच्या संघाने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलिया प्रथम फलंदाजी करताना ५ बाद १३४ धावांपर्यंत मजल मारू शकला. भारताविरूद्ध सामन्यात चांगली कामगिरी करणारी ग्रेस हॅरिस या सामन्यात अपयशी ठरली आणि ती ३ धावा करत बाद झाली. तर बेथ मुनीने उत्कृष्ट खेळी खेळत ४२ चेंडूत २ चौकारांसह ४४ धावांची चांगली खेळी केली. यानंतर वेयरहम ५ धावा करत बाद झाली तर ताहिला मॅकग्रा २७ धावा आणि एलिस पेरी ३१ धावा करत बाद झाली. त्यानंतर लिचफिल्डने १६ धावांचे योगदान देत ५ बाद १३४ धावांपर्यंत संघाला नेले. आफ्रिकेकडून अयोबोंगा खाकाने २ विकेट तर मारिजन काप आणि मल्बा यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. टी-२० विश्वचशक २०२४ मधील उपांत्य फेरीतील दुसरा सामना न्यूझीलंड विरूद्ध वेस्ट इंडिज यांच्यात उद्या म्हणजे १८ ऑक्टोबरला खेळवला जाणार आहे. या सामन्यातील विजयी संघ २० ऑक्टोबरला दक्षिण आफ्रिकेविरूद्ध महिला टी-२० विश्वचषक २०२४ चा अंतिम सामना खेळणार आहे.या विजयासह दक्षिण आफ्रिकेचा संघ सलग दुसऱ्यांदा टी-२० विश्वचषकाच्या अंतिम फेरीत पोहोचला आहे. गतवर्षीच्या महिला टी-२० विश्वचषकाच्या अंतिम फेरीत ऑस्ट्रेलियाने आफ्रिकेचा पराभव केला होता. यंदा उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाला बाहेर करत दक्षिण आफ्रिकेने मोठा बदला घेतला आहे. २०२३ मध्ये, केप टाऊनमधील न्यूलँड्स येथे झालेल्या फायनलमध्ये सन लुसचा दक्षिण आफ्रिका मेग लॅनिंगच्या ऑस्ट्रेलियाकडून १९ धावांनी पराभूत झाला होता.लॉरा वोल्वार्ड्या नेतृत्वाखालील महिला संघाने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पराभवाचा बदला घेतला, ऑस्ट्रेलियाची कर्णधार एलिसा हिली पायाच्या दुखापतीमुळे सामन्यातून बाहेर होती. या विजयासह दक्षिण आफ्रिकेनेही महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेत ऑस्ट्रेलियाला आठ सामन्यांमध्ये पराभूत केले.

### लोरा वोल्वार्डची 42 धावांची खेळी

त्यांनी या स्पर्धेत ऑस्ट्रेलियाच्या सलग १५ सामन्यांच्या विजयी मालिकेला पूर्णविराम लावला.ऑस्ट्रेलियाने दिलेल्या १३५ धावांच्या प्रत्युत्तरात आफ्रिकेने चांगली सुरूवात केली. कर्णधार सलामीवीर लोरा वोल्वार्ड हिने उत्कृष्ट ४२ धावांची खेळी केली तर ब्रिट्स १५ धावा करत बाद झाली. यानंतर सामनावीर ठरलेल्या ॲनेके बॉश हिने ४८ चेंडूत ८ चौकार आणि एका षटकारासह ७४ धावांची शानदार खेळी करत संघाच्या विजयात मोठी भूमिका बजावली. विजयी चौकार लगावत बॉशने आफ्रिकेने अंतिम फेरीत धडक मारली. ऑस्ट्रेलियाकडून सदरलँडला फक्त दोन विकेट घेता आले.

# कोहलीला तिसऱ्या क्रमांकावर का पाठवलं?

## तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला पाठवण्याची कल्पना कोणाची

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**न्यूझीलंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिल्या कसोटीत भारतीय क्रिकेट संघाची सुरुवात अत्यंत खराब झाली आहे. पावसामुळे पहिल्या दिवशी नाणेफेकही नाही झाली आणि सामन्याचा खेळ रद्द झाला.**







अशा स्थितीत दुसऱ्या दिवसापासून सामना सुरू झाला ज्यामध्ये भारतीय फलंदाजांनी घरच्या मैदानावर खेळल्या गेलेल्या सामन्यांमध्ये आतापर्यंतची सर्वात खराब कामगिरी नोंदवली आणि संपूर्ण संघ ४६ धावांवर गडगडला. भारतीय संघाचे ५ फलंदाज खाते न उघडताच बाद झाले. सामन्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत विराट कोहलीला तिसऱ्या क्रमांकावर पाठवण्याची कल्पना कोणाची होती, त्यावर रोहित शर्माने उत्तर दिलं आहे. बंगळुरू कसोटीत टीम इंडिया फक्त दोन वेगवान गोलंदाजांसह खेळत आहे. न्यूझीलंडच्या वेगवान गोलंदाजांच्या त्रिकुटाने भारताला फलंदाजी करताना जास्त वेळ मैदानावर टिकू दिले नाही. मॅट हेन्रीच्या ५ विकेट आणि विल्यम ओरूकच्या ४ विकेट्सपुढे संपूर्ण भारतीय संघाने शरणागती पत्करली. याच सामन्यात विराट कोहलीला तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी पाठवण्यात आले आणि तोही फ्लॉप ठरला. पत्रकार परिषदेत रोहितने विराट तिसऱ्या क्रमांकावर का आला आणि केएल राहुलला का पाठवले नाही हे सांगितले.विराट कोहलीने आपल्या कारकिर्दीत सर्वाधिक वेळेस चौथ्या क्रमांकावर फलंदाजी केली आहे. शुबमन गिल संघाबाहेर झाल्यानंतर केएल राहुल तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला येऊ शकतो, असे बोलले जात होते. पण तसे झाले नाही आणि त्याच्या जागी विराट कोहली फलंदाजीला आला.

### फलंदाजीच्या स्थितीत छेडछाड

रोहित आऊट झाल्यानंतर कोहली क्रीजवर आला आणि तोही खाते न उघडताच बाद झाला. रोहित शर्मा पत्रकार परिषदेत म्हणाला की, आम्हाला केएल राहुलच्या फलंदाजीच्या स्थितीत छेडछाड करायची नव्हती. त्याला सहाव्या क्रमांकावर आपले स्थान मिळाले आहे. अशा परिस्थितीत, आम्ही त्यांना त्याच नंबरवर आहार देऊ इच्छितो. सर्फराझच्या बाबतीतही तेच आहे. आम्हाला त्याला त्याच फलंदाजीची स्थिती द्यायची आहे.